सकाळ

जळगाव, शनिवार, १७ मे २०२५ ५

MAHARASHTRA

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीची सूचना

मे. अंबुजा काँक्रिट नॉर्थ प्रायव्हेट यांच्या ६ एमएमटीपीए (२x3 एमएमटीपीए) सिमेंट उत्पादन क्षमतेसह स्टँड अलोन ग्राइंडिंग युनिट या उद्योगासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याचा प्रस्ताव मे. अंबुजा काँक्रिट नॉर्थ प्रायव्हेट लिमिटेड, जळगाव यांचेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेला आहे.

भारत सरकार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस. ओ. १५३३, दि. १४/०९/२००६ (दिनांक ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरूपात नोंदविता येतील. लेखी स्वरूपात सूचनाही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात, तसेच कार्यालयातील शाखेमध्ये जनसुनावणीच्या अगोदर लेखी किंवा तोंडी आपल्या आवाजात रेकॉर्ड करून ई-मेल- srojalgaon1@mpcb.gov.in वर सादर करू शकतात किंवा जनसुनावणीच्या वेळी आपले निवेदन सादर करू शकतात.

**उपप्रादेशिक कार्यालय,**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल 'ए'
३ रा मजला, जुने बी. जे. मार्केट, जळगाव
जळगाव- ४२५००१, दूरध्वनी क्र. ०२५७- २२२१२८८
ई-मेल : srojalgaon1@mpcb.gov.in

तसेच तोंडी अथवा लेखी स्वरूपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात.

या अनुषंगाने मे. अंबुजा काँक्रिट नॉर्थ प्रायव्हेट यांच्या ६ एमएमटीपीए (२x3 एमएमटीपीए) सिमेंट उत्पादन क्षमतेसह स्टँड अलोन ग्राइंडिंग युनिट या उद्योगासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

**लोकसुनावणीचे ठिकाण : रजत हॉल, स्टेट बँकेजवळ, म्हसावद, ता. जि. जळगाव**
**लोकसुनावणीची दिनांक : दि. १९-०६-२०२५**
**लोकसुनावणीची वेळ : सकाळी ११.३० वाजता**

सदर जाहीर लोकसुनावणीशी संबंधित माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेले असून, कार्यालयीन वेळेमध्ये संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगाव
४) उपविभागीय कार्यालय, जळगाव, ता. जि. जळगाव
५) तहसील कार्यालय, जळगाव, ता. जि. जळगाव
६) गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जळगाव, ता. जि. जळगाव
७) ग्रामपंचायत कार्यालय, बोरनार, म्हसावद, नागदुली, डोमगाव, वाकडी, बिलवाडी, पाथरी, वाडली, वावदादा, दहीगाव, ता. जि. जळगाव
८) उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल 'ए', ३ रा मजला, जुने बी. जे. मार्केट, जळगाव, जळगाव- ४२५००१
९) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, त्र्यंबक रोड, आयटीआयजवळ, सातपूर, नाशिक- ४२२००७
१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई- ४०००२२.
११) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई
१२) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१

सदरील जाहीर लोकसुनावणीबाबतची सूचना ही मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या मान्यतेने देण्यात येत आहे.

**(करणसिंग अमरसिंग राजपूत)**
उपप्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगाव